भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका भिवंडी (ठाणे)

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## वैद्यकिय आरोग्य विभाग

प्रस्तावना :-

विषय :- महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी क्लिनिकल लॅब/ पॅथॉलॉजी लॅब यांची महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागांतर्गत नोंदणी करणे बाबत.

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन सादर करणेत येते की, महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वैद्यकिय क्षेत्राशी संबधीत खाजगी हॉस्पीटल/ मॅर्टर्निटी होम/ क्लिनिक/दवाखाने/ क्लिनिकल लॅब/ पॅथॉलॉजी लॅबचे मध्यमातुन वैद्यकिय व्यवसाय करणेत येत आहे.

त्यापैकी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी हॉस्पीटल/ मॅर्टर्निटी होम यांची बॉम्बे नर्सिंग होम अधिनियम १९४९ (सुधारीत) २००५ व सध्याचे महाराष्ट्र नर्सिंग होम रजिस्ट्रेशन (सुधारीत) नियम २०२१ अन्वये वैद्यकिय आरोग्य विभागांतर्गत नोंदणी करणेत येत आहे. उपरोक्त अधिनियम हॉस्पीटल/ नर्सिंग होम संबधीत असल्यामुळे या अधिनियमा अंतर्गत महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी क्लिनिकल लॅब/पॅथॉलॉजी लॅब नोंदणी करता येत नाही.

तसेच शासन वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाकडील शासन परिपत्रक क्र एमएमपी-०५१६/प्र.क्र.२१/अधिनियम दि.२४ मे २०१६ रोजीचे परिपत्रकान्वये डी.एम.एल.टी. पदविका किंवा इतर तत्सम अर्हता धारण करणारे व्यक्ती हे तपासणीसाठी घेण्यात आलेल्या नमुन्याचे स्वतः विश्लेषण करु शकतात व त्यांच्या निकालाच्या नोंदी घेउ शकतात. परंतु नोंदणीकृत विकृतीशास्त्रज्ञाची (वैध रीतीने) नियुक्ती न करता ते स्वतंत्रपणे विकृतीचिकित्सा प्रयोगशाळा चालवू शकत नाहीत व नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी असल्याखेरीज विकृतिचिकित्सा तपसण्यांचे अहवाल प्रमाणित करणे अवैध वैद्यक व्यवसाय ठरतो. तसेच अवैध व्यवसाय महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी नियम १९६१ च्या कलम ३३ च्या पोट कलमाच्या तरतुदीचे उल्लघंन करणे हा अपराध असून कलम ३३ च्या पोट कलम (२) मध्ये शिक्षेची तरतुद आहे. यासंदर्भात शासनस्तरावरुन परिपत्रक प्रसिध्द करणेत आले होते. मात्र राज्याच्या ग्रामीण क्षेत्रातील जनतेला विकृतीचिकित्सा तपासण्यांची सुविधा तत्परतेने उपलब्ध व्हावी म्हणून महाराष्ट्र परावैद्यक अधिनियम २०११ (२०१६ चा महा. अधि क्र.६) अंमलात आल्यावर महाराष्ट्र परावैद्यक परिषदेकडे नोंदणी केलेल्या डी.एम.एल.टी. व तत्सम अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तींना राज्याच्या ग्रामीण क्षेत्रामध्ये विर्निर्दिष्ट विकृतिचिकित्सा तपसण्या करण्याचे अधिकार प्रदान करणेबाबत राज्य शासन विचार करीत असल्याचे कारण देत शासन परिपत्रक क्र एमएमपी-०५१६/प्रक्र.२३ अधिनियम दि.२६ मे २०१६ रोजीचे परिपत्रकान्वये शासनस्तरावरुन उक्त परिपत्रक तत्काळ तहकुब करणेत आले आहे.

तथापी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी क्लिनिकल लॅब/पॅथॉलॉजी लॅब यांचे संदर्भात येणाऱ्या तक्रारीमध्ये दिवसे दिवस वाढ होत आहे. काही ठिकाणी खाजगी क्लिनिकल लॅब/पॅथॉलॉजी लॅब मधून देणेत येणारे रिपोर्ट हे पॅथॉलॉजीस्ट यांचे अधिपत्याखाली होत नसल्याने या बाबत देखील नागरीकांच्या नियमीत तक्रारी दाखल होत आहेत.

सबब महानगरपालिकेकडून येथिल खाजगी क्लिनिकल लॅब/पॅथॉलॉजी लॅब यांचेकडून होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी त्यांचेवर महागनरपालिकेचे अधिकृत नियंत्रण असणे अत्यंत गरजेचे आहे. जेणेकरुन त्यांचे विरुध्द नियमित येणाऱ्या तक्रारींना आळा बसेल. तसेच पनवेल महापालिकेने तयार केलेल्या सॉफ्टवेअरच्या धर्तीवर सॉफ्टवेअर तयार करुन

खाजगी क्लिनिकल लॅब/पॅथॉलॉजी लॅब यांची नोदंणी केल्यास साथीचे आजार व इतर रुग्णांची वेळेचे वेळी (real time) इत्यंभुत माहिती महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागाकडे उपलब्ध होईल.

यास्तव महानगरपालिका कार्यक्षेत्रात सध्या खाजगी क्लिनिकल लॅब/पॅथॉलॉजी लॅबचे लॅब टेक्नीशियन अथवा पॅथॉलॉजीस्ट यांचे व्यवसायांचे ठिकाणांची त्यांचे नावानिशी व त्यांनी धारण केलेल्या पात्रतेसहीत महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागाकडे महानगरपालिकेच्या परवाना शुल्क व्यतीरीक्त इतर शुल्क न आकारता महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी क्लिनिकल लॅब/पॅथॉलॉजी लॅब यांची नोदंणी सुरु करणेसाठी मा. वैद्यकिय आरोग्य अधिकारी सो., मा. अति. आयुक्त सो., मा. आयुक्त सो. यांनी प्रस्तावास पूर्व मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार प्रशासकिय मान्यता मिळणेकामी प्रस्तावना सादर करणेत येत आहे.

ठराव क्रं. ५०८ दिनांक :- ६/०९/२०२४

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी क्लिनिकल लॅब/पॅथॉलॉजी लॅब यांचेकडून होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी त्यांचेवर महागनरपालिकेचे अधिकृत नियंत्रण असणे अत्यंत गरजेचे असल्याने व त्यांचे विरुध्द नियमित येणाऱ्या तक्रारींना आळा घालणेसाठी व साथीचे आजार व इतर रुग्णांची वेळेचे वेळी (real time) इत्यंभुत माहिती महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागाकडे उपलब्ध होण्यासाठी सॉफ्टवेअर तयार करुन महानगरपालिका कार्यक्षेत्रात सध्या खाजगी क्लिनिकल लॅब/पॅथॉलॉजी लॅबचे लॅब टेक्नीशियन अथवा पॅथॉलॉजीस्ट यांचे व्यवसायांचे ठिकाणांची त्यांचे नावानिशी व त्यांनी धारण केलेल्या पात्रतेसहीत महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागाकडे महानगरपालिकेच्या परवाना विभागाकडील शुल्क व्यतीरीक्त इतर शुल्क न आकारता महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी क्लिनिकल लॅब/पॅथॉलॉजी लॅब यांची नोदंणी सुरु करणेसाठी संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

d:\shailesh khane 1\clinic lab nondani.docx

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय** :- प्रभाग समिती क्र.३ च्या कार्यक्षेत्रातील वार्ड क्र.१७ मधील खालील नमुद ठिकाणांचे नामकरण करणेबाबत..

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र.३ च्या कार्यक्षेत्रातील खालील नमुद ठिकाणांचे नामकरण करणे कामी मा.श्री.संतोष एम.शेट्टी, माजी नगरसेवक यांचे दि.१८/१०/२०२३, १८/१०/२०२३ व २१/०१/२०२४ रोजीच्या पत्रान्वये खालील नमुद प्रमाणे नामकरण करणे बाबत सुचविले आहे.

| अ.क्र. | ठिकाण | नामकरणाचे नाव |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१७ मधील पद्मानगर वॉटर सप्लाय रोड जाणाऱ्या रस्त्यावरुन स्वागत बिल्डींगकडे वळण घेणाऱ्या चौक. | माजी नगरसेवक कै.शंकर आशय्या कमटम चौक |
| २ | प्रभाग क्र.१७ क मधील पद्मानगर भावनाऋषी नगर समोरील चौक. | भावनाऋषी नगर चौक |
| ३ | प्रभाग क्र.१७ क मधील पद्मानगर येथील साईनाथ ट्रान्सपोर्ट ते अखिल पद्मशाली हॉल पर्यंत मार्गास माजी नगरसेवक कै.नरसप्पा रामय्या कोंडा मार्ग. | माजी नगरसेवक कै.नरसप्पा रामय्या कोंडा मार्ग |

उपरोक्त कामी प्रस्ताव मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे मंजूरी करिता सादर करण्यांत आला असता, सदर प्रस्तावास शहर अभियंता, अति-आयुक्त यांनी केलेल्या शिफारसी प्रमाणे मा.प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी त्यास दि.२३/०८/२०२४ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये प्रशासकिय ठराव करणेकामी मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव क्र. ५१० दिनांक :- ०६/९/२०२४

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र.३ च्या कार्यक्षेत्रातील खालील नमुद ठिकाणांचे नामकरण करणे कामी मा.श्री.संतोष एम.शेट्टी, माजी नगरसेवक यांचे दि.१८/१०/२०२३, १८/१०/२०२३ व २१/०१/२०२४ रोजीच्या पत्रान्वये खालील नमुद प्रमाणे नामकरण करणे बाबत सुचविले आहे.

| अ.क्र. | ठिकाण | नामकरणाचे नाव |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१७ मधील पद्मानगर वॉटर सप्लाय रोड जाणाऱ्या रस्त्यावरुन स्वागत बिल्डींगकडे वळण घेणाऱ्या चौक | माजी नगरसेवक कै.शंकर आशय्या कमटम चौक |
| २ | प्रभाग क्र.१७ क मधील पद्मानगर भावनाऋषी नगर समोरील चौक | भावनाऋषी नगर चौक |
| ३ | प्रभाग क्र.१७ क मधील पद्मानगर येथील साईनाथ ट्रान्सपोर्ट ते अखिल पद्मशाली हॉल पर्यंत मार्गास माजी नगरसेवक कै.नरसप्पा रामय्या कोंडा मार्ग असे नांव देणेबाबत | माजी नगरसेवक कै.नरसप्पा रामय्या कोंडा मार्ग |

कृ.मागे पहा

उपरोक्त कामी प्रस्ताव मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे मंजूरी करिता सादर करण्यांत आला असता, सदर प्रस्तावास शहर अभियंता, अति-आयुक्त यांनी केलेल्या शिफारस केलेली आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्याच अधिकारानुसार मी अजय वि.वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये वरिल नमुद कामांचे प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**(अजय वि. वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**